आल्याच्या चहाने शरीरचक्रास चालना

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : सकाळची सुरुवात चालण्याने करणे हा ऊर्जेची पातळी वाढवण्याचा आणि एकूणच आरोग्य सुधारण्याचा उत्तम मार्ग आहे. पण त्याला एक कप आल्याच्या चहाची जोड मिळाल्यास ते आणखी फायदेशीर ठरू शकते. दाहकविरोधी आणि पचनशक्ती वाढवणाऱ्या गुणधर्मांसाठी ओळखला जाणारा आल्याचा चहा तुमच्या सकाळच्या दिनचर्येत आश्चर्यकारक पद्धतीने सुधारणा करू शकतो. हे पेय शरीरावर कसा परिणाम करते आणि ते प्रत्येकासाठी योग्य आहे का, याकडे तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
गृह कर्ज @ 7.35%* शून्य प्रक्रिया शुल्क
मिस्ड कॉल द्या 8010 614 614 | अर्जासाठी स्कॅन करा

आल्यातील नैसर्गिक संयुगे तुमच्या शरीराच्या चक्राला चालना देऊ शकतात. आल्यामध्ये दाहकविरोधी गुणधर्म असतात. जर तुम्हाला सकाळी जडपणा जाणवत असेल, तर आल्याचा चहा प्यायल्याने आराम मिळतो. पोट शांत करण्यास, फुगणे कमी करण्यासही आले मदत करू शकते, जेणेकरून तुम्ही चालण्यावर लक्ष केंद्रित करू शकता, याकडे तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. आल्यामध्ये जीवनसत्त्वे, मॅग्नेशियम, अँटीऑक्सिडंट्ससारखे फायदेशीर घटक असतात. यामुळे रोगप्रतिकारक शक्तीलाही चालना मिळते, असे तज्ज्ञ सांगतात.

Dr. Rucha's Tanvi HERBALS CLINIC
डॉ. रुचाज् तन्वी हर्बल्स क्लिनिक आणि नवतेज पंचकर्म सेंटर
हिवाळ्यात वाढणाऱ्या सांधेदुखीला आजच ब्रेक लावा!
FREE हेल्थ चेकअप
तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन. आजच नाव नोंदवा
ठाणे : 9082911530
तन्वी संचालिका डॉ. रुचा मेहेंदळे - पै By appointment only
आयुर्वेदिक एक्स्पर्ट डॉ. आकांशा स. 11 ते 1
डॉ. प्राची सायं.4 ते 6

राज्यात आजही थंडीच्या लाटेचा इशारा

जळगाव, धुळे, नाशिकमध्ये कडाका कायम

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईत थंडीचा मुक्काम कायम असून मंगळवारी तापमानाचा पारा आणखी घसरला. हवामान विभागाच्या सांताक्रूझ केंद्रात १७.४ अंश सेल्सिअस, तर कुलाबा केंद्रात २१.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. दरम्यान, किमान तापमानातील ही घट पुढील एक ते दोन दिवस कायम राहणार आहे. याचबरोबर काही जिल्ह्यांमध्ये बुधवारी थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

जळगाव येथे सर्वात कमी तापमान

जळगाव येथे मंगळवारी सर्वात कमी किमान तापमानाची नोंद झाली. तेथे ७.१ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. गेले काही दिवस जळगाव जिल्ह्यात कडाक्याची थंडी आहे. तेथे मंगळवारी थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. मागील काही दिवस जळगावमध्ये किमान तापमान ६ ते ९ अंशादरम्यान नोंदविण्यात आले आहे.

गेले काही दिवस मुंबईच्या किमान आणि कमाल तापमानात चढ-उतार होत आहे. राज्याबरोबरच मुंबईतही पहाटे आणि रात्री थंडी, तसेच दिवसभर बोचरे वारे अनुभवायला मिळत आहेत. मुंबईतील सांताक्रूझ येथे मंगळवारी हंगामातील सर्वात कमी किमान तापमानाची नोंद झाली. तेथे १७.४ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. हे तापमान सरासरीपेक्षा ३.८ अंश सेल्सिअसने कमी होते. या हंगामातील मागील सर्वात कमी किमान तापमान १६ नोव्हेंबर रोजी १७.८ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले होते. त्यानंतर मंगळवारी पुन्हा पारा १८ अंश सेल्सिअसखाली नोंदला गेला. दरम्यान, राज्यातील काही भागांत मंगळवारी थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा बुधवारीही काही जिल्ह्यांत थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला. यानुसार जळगाव, धुळे आणि नाशिक भागात बुधवारी थंडीच्या लाटेची शक्यता आहे. इतर भागांतही तापमानातील घट कायम राहील असा अंदाज आहे.

'विचारवेध चळवळी'चे आनंद करंदीकर यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : विचारवेध चळवळीचे आधारस्तंभ, ज्येष्ठ लेखक-विचारवंत, निवडणूक विश्लेषक आणि विविध सामाजिक संघटनांशी निकटचा संबंध असलेले ज्येष्ठ कार्यकर्ते आनंद करंदीकर (वय ७५) यांचे मंगळवारी सायंकाळी पुण्यात अल्पशा आजाराने निधन झाले. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांचे आनंद हे पुत्र होत.

गेल्या काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती बरी नव्हती. पाषाण येथील अथश्री येथे वास्तव्यास असलेले करंदीकर मंगळवारी दुपारी एका कार्यक्रमानिमित्त घराबाहेर पडले होते. कार्यक्रमात असतानाच त्यांना श्वास घेण्यास त्रास जाणवू लागला. त्यामुळे त्यांनी घरी परतण्याचा निर्णय घेतला. मात्र, घरी पोहोचण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली, अशी माहिती करंदीकर यांचे युक्रांदमधील सहकारी अन्वर राजन यांनी दिली.

गटबाजीला कंटाळून काँग्रेसमध्ये सामूहिक राजीनामे

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : नगरपंचायत, नगरपालिकेत उमेदवारी देताना मनमानी झाल्याचा आरोप करीत वाडी पालिका क्षेत्रातील काँग्रेसचे कार्यकारिणी सदस्य, पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले असून ते प्रदेश अध्यक्षांकडे पाठवले आहेत.

२२१ पदाधिकाऱ्यांचा समावेश

निवडणुकीच्या तोंडावर हा काँग्रेसला मोठा धक्का मानला जातो.

नगरपालिका अध्यक्षपदाची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील व्यक्तीला दिली. ती देताना विश्वासात घेण्यात आले नाही. त्यामुळे कार्यकर्ते नाराज झाले. अनेक वर्षांपासून पक्षात निष्ठेने काम करणाऱ्यांचा हा अपमान आहे. त्यामुळे आम्ही राजीनामे देत आहोत, असे प्रदेश अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात राजीनामे देणाऱ्यांनी नमूद केले आहे. राजीनामे देणाऱ्यांमध्ये एकूण २२१ पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यात प्रामुख्याने शैलेश थोराणे, राजेश थोराणे, राजेश कोकाटे, भीमराव लोखंडे, अन्य पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी विशेष तपास पथक

हिंदी चित्रपटसृष्टीतील कलाकार, माजी आमदाराचीही चौकशी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : दुबईतून प्रत्यार्पित करण्यात आलेला अमली पदार्थाच्या टोळीचा माफिया सलीम शेख याची कसून चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे. शेखने हिंदी सिनेसृष्टीतील (बॉलीवूड) अनेक कलाकारांना अमली पदार्थ पुरविल्याचा दावा केला असून त्याने चौकशीत नावे उघड झालेल्या सर्व सेलिब्रेटी आणि राजकारण्यांची चौकशी केली जाणार आहे.

मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफाश केला. या प्रकरणात अमली पदार्थांचा सूत्रधार मोहम्मद सलीम मोहम्मद सुहेल शेख याला नुकतेच संयुक्त अरब अमिरातीमधून (यूएई) प्रत्यार्पण करून भारतात आणले. हे प्रकरण अडीच कोटींच्या अमली पदार्थांचे असून शेखने भारतात अमली पदार्थांच्या विक्रीचे जाळे तयार केले होते. या प्रकरणी गुन्हे शाखा २ च्या देखरेखीखाली विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे.

'एमडी'मधील सर्वात मोठी कारवाई

आरोपीने हिंदी सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकार आणि राजकीय नेते यांच्यासाठी देशात आणि विदेशात अमली पदार्थांच्या मेजवान्या (पार्टी) आयोजित केल्या होता. अभिनेत्री श्रद्धा कपूर, सिद्धार्थ कपूर, निर्माता दिग्दर्शक अब्बास-मस्तान, माजी आमदार झिशान सिद्दीकी, अभिनेत्री नोरा फतेही, समाजमाध्यम प्रभावक ओरी ऊर्फ ओरहान, हसीना पारकरचा मुलगा अलीशाह पारकर आदींची नावे समोर आली होती.

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि)
नोंदणीकृत कार्यालय: सहावा मजला,बी बिल्डींग, गंगा ट्रुएनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र 411014
शाखा कार्यालय युनिट: ऑफिस क्र. 305, तिसरा मजला, यमुना प्लाझा, मूर्तीजापूर हायवे, रामलता बिझनेस सेंटर जवळ, अकोला - 444001
ई-लिलाव - विक्री सूचना (सर्फेसी अधिनियमांतर्गत अचल अनामत मत्तेची विक्री)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 व 9 सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (''अधिनियम'') अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाणकार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, कारण 17 नोव्हें 2023 पासून पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड हे नाव बदलून गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड असे करण्यात आले आहे (पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड आणि मूलतः जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक लिमिटेड कंपनी या नावाने स्थापित) (सदर अधिनियमानुसार यापुढे ''सुरक्षित धनको'' असा उल्लेख करण्यात येईल) कडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचनेच्या अनुषंगाने सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स मधील नियम 8 व 9 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत ताबा घेतलेला आहे.

सदर अनामत मत्तांची ई-लिलावाच्या माध्यमातून 20/12/2025 रोजी ''जशी आहे जेथे आहे, जशी आहे जे काही आहे आणि तेथे जे काही आह'' तत्त्वावर करण्यात येईल. याद्वारे आम जनतेस हे सूचित करण्यात येते की https://www.bankeauctions.com या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून जाहीर लिलाव राबविण्यात येणार आहे. विक्रीच्या अटी व शर्तींसाठी कृपया जीएच4एफएल/सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे www.grihumhousing.com येथे दिलेली लिंक पाहावी.

अ. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव {ए}	मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम {बी}	ताब्याचा प्रकार {सी}	मालमत्तेचा वर्णन {डी}	आरक्षित किंमत {ई}	बयाणा रक्कम (आ.कि. च्या 10%){एफ}	बयाणा रक्कम प्रस्तुतीकरण दिनांक (जी)	बोली वृद्धी {एच}	मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ {आय}	लिलाव दिनांक आणि वेळ {जे}	असल्यास ज्ञात बोजे/ न्यायालयीन खटले {के}
1	कर्ज क्र. HL0060110000000 5002450 सादिक अहमद अब्दुल लतीफ (कर्जदार), आसना तहरीम सादिक अहमद (सह-कर्जदार)	सूचना दिनांक: 07/06/2025 एकूण थकबाकी: दि. 07/06/2025 रोजी देय रु. 1343033/- (रुपये तेरा लक्ष त्रेचाळीस हजार तेहत्तीस फक्त) अधिक वसुलीच्या दिनांकापर्यंतचे वार्षिक 16.60% दराने व्याज.	प्रत्यक्ष	जमीन गट क्र. 53, प्लॉट क्र. 22ए, 22बी, 23ए आणि 23बी, मौजे पारस, तह. बालापूर आणि जिल्हा अकोला. एकूण क्षेत्रफळ सुमारे 408 चौ.मी., शहर परिषद बालापूर यांच्या अधिकार क्षेत्रात,तह. बालापूर, जिल्हा अकोला, मालमत्तेच्या चतुःसीमा: पूर्वेस-प्लॉटचा रस्ता, पश्चिमेस-प्लॉट क्र.24ए आणि 25ए, उत्तरेस-प्लॉटचा रस्ता, दक्षिणेस-प्लॉटचा रस्ता.	रु. 11,52,375/- (रुपये अकरा लक्ष बावन्न हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त)	रु. 1,15,237.5/- (रुपये एक लक्ष पंधरा हजार दोनशे सदतीस आणि पन्नास पैसे फक्त)	19/12/2025 रोजी सायं. 5 वाजेपर्यंत	10,000/-	15/12/2025 (स.11-दु. 4)	20/12/2025 (स.11-दु.2)	निरंक

इच्छुक बोलीदार / खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी बोली सादर करण्याअगोदर सुरक्षित धनकोची शाखा आणि लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तांना भेट द्यावी आणि स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त शुल्के, बोजे आणि तिसऱ्या पक्षाचे हित इ. बाबत चौकशी करावी आणि सर्व प्रकारे स्वतःची खात्री करून घ्यावी. मालमत्तेशी संबंधित सर्व वैधानिक देणी म्हणजे मालमत्ता कर, वीज / पाणी बिलाची थकबाकी आणि असल्यास, इतर शुल्के यांबाबत चौकशी करण्याची आणि त्यांचा भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदाराची असेल. इच्छुक बोलीदारांना ई-बोलीसाठी लिलाव सेवा पुरवठादार सी1 इंडिया प्रा.लि., पत्ता - प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, गुडगाव, हरयाणा - 122003 यांचेकडे पोर्टलवर नोंदणी करणे आणि पुरेसा वेळ असतांना लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे. हेल्पलाईन क्रमांक - 7291981124, 25, 26 सपोर्ट ईमेल आयडी- Support@bankeauctions.com. संपर्क व्यक्ती - धरणी पी., ईमेल आयडी - dharani.p@c1india.com, संपर्क क्र.: 9948182222. कृपया लक्षात घ्यावे की संभाव्य बोलीदार केवळ त्यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात. इच्छुक बोलीदारांना कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेवर काढलेली बयाणा रक्कम ''गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड - इलाव रक्कम खाते'', बँक - आयसीआयसीआय बँक लि., खाते क्र. 091551000028, आयएफएससी कोड: ICIC0000915, आयसीआयसीआय बँक लि., पंचशील टेक पार्क, गणपती चौकाजवळ, 43/4, विमान नगर - 411014 यांचे नावे काढलेल्या आरटीजीएस/एनईएफटी/डीडी च्या माध्यमातून स्तंभ जी मध्य नमूद दिनांकापर्यंत सादर करावी आणि आपले नाव https://www.bankeauctions.com येथे नोंदवावे आणि सेवा पुरवठादारांकडून युजर आयडी व पासवर्ड आणि ई-लिलावाचे प्रशिक्षण निःशुल्क प्राप्त करावे. वेबसाईटवर नोंदणी केल्यानंतर इच्छुक बोलीदारांनी/खरेदीदारांनी पुढील दस्तावेजांच्या प्रती अपलोड करून त्या ईमेल कराव्यात आणि स्वाक्षांकित छापील प्रत पत्ता - पहिला मजला, रुईकर कॉम्प्लेक्स, चर्च रोड, सिव्हील लाईन्स, यवतमाळ, महाराष्ट्र 445 001येथे पाठवावी. मोबाईल क्र. +91 9567626050 ई-मेल आयडी rahul.r1@grihumhousing.com ई-लिलावात सहभागी होण्यासाठी अटी व शर्तींच्या अधिक तपशीलासाठी कृपया https://www.bankeauctions.com आणि www.grihumhousing.com येथे भेट द्यावी.

ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदार/ गहाणकार / जामीनदार यांचेसाठी 30 दिवसांची सूचनादेखील समजण्यात यावी.

कोणत्याही परिस्थितीत स्थानिक भाषेतील प्रकाशन आणि इंग्रजी वर्तमानपत्रातील प्रकाशनामधील मजकुरात फरक असल्यास दि इंडियन एक्स्प्रेस वर्तमानपत्रात प्रकाशित झालेला इंग्रजी भाषेतील मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

दिनांक: 19.11.2025, स्थान: अकोला | स्वा/- प्राधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि.)

दीया फंड
आजच तुमच्या प्रिय व्यक्तीची वारस म्हणून नेमणूक करा, त्यांचं भविष्य सुरक्षित बनवा

वारस नेमणुकीमुळे तुमच्या मृत्यूनंतर, कोणत्याही अडथळ्यांशिवाय, तुमच्या प्रिय व्यक्तीला तुमची आर्थिक मालमत्ता मिळण्याची खात्री होते
- तुमच्या बँक खात्यासाठी, लॉकर आणि इतर आर्थिक मालमत्तेसाठी तुमचा वारस नेमा
- वारसाचा तपशील बँकेकडे तपासता येतो

अधिक माहितीसाठी, https://rbikehtahai.rbi.org.in/nf वर जा
अभिप्राय देण्यासाठी, rbikehtahai@rbi.org.in ला लिहा
सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

केसरी कार्निवल आपल्या नागपूरमध्ये!
फ्री टूर जिंकण्याची संधी
युरोप / दुबई / थायलँड / हिमाचल

केसरी कार्निवल म्हणजे डिस्काउंट्सचा, अविस्मरणीय अनुभवांचा खजिना!
फ्री सेमिनार्स, व्हर्च्युअल टूर्स, लकी ड्रॉ, गिफ्ट व्हाऊचर्स आणि भरघोस ऑफर्ससह बरंच काही!
अनेक डिस्काऊंट्स | वन लाईन ऑफर प्राईस* | ऑन द स्पॉट डबल डिस्काऊंट* | १८ हजारांपर्यंत* स्टुडंट स्पेशल (2 ते 18 वर्षे) | ऑल इंडिया वन प्राईस* | 8+ ग्रुप* | नो कॅन्सलेशन चार्जेस* | एक्स गेस्ट* | बोनान्झा डिस्काऊंट* | कॉम्बो डिस्काऊंट* | 0% EMI*
एक्स्पर्टस्चं मार्गदर्शन, सर्व शंकांचं निरसन - मगच बुकिंग करा!

शनिवार,22 नोव्हेंबर		रविवार,23 नोव्हेंबर	
11 AM	पॉप्युलर युरोप ऑस्ट्रेलिया न्यूझीलँड	11 AM	ऑफबीट युरोप
1 PM	साऊथ आफ्रिका, अमेरिका, दुबई साऊथ ईस्ट एशिया	2 PM	जपान
3 PM	नेपाळ, भुतान आणि मारीगोल्ड आध्यात्मिक यात्रा	3 PM	भारतीय टूर्स

माईलस्टोन बिल्डींग, वर्धा रोड, रामदासपेठ, नागपूर | सकाळी 10 ते सायंकाळी 6

युरोप 7 ते 22 दिवस सहलींचे 36 पर्याय
आफ्रिका 6 ते 13 दिवस सहलींचे 6 पर्याय
ऑस्ट्रेलिया न्यूझीलँड 7 ते 17 दिवस सहलींचे 4 पर्याय
जपान कोरिया 6 ते 9 दिवस सहलींचे 5 पर्याय
अमेरिका 6 ते 20 दिवस सहलींचे 9 पर्याय
साऊथ ईस्ट एशिया 4 ते 12 दिवस सहलींचे 22 पर्याय
श्रीलंका मालदिव्स 6 ते 8 दिवस सहलींचे 3 पर्याय

भुतान नेपाळ 7 ते 10 दिवस सहलींचे 3 पर्याय
दुबई मिडल ईस्ट 5 ते 10 दिवस सहलींचे 10 पर्याय
केरळ 5 ते 10 दिवस सहलींचे 9 पर्याय
राजस्थान 4 ते 15 दिवस सहलींचे 12 पर्याय
अंदमान 5 ते 7 दिवस सहलींचे 3 पर्याय
हिमाचल 6 ते 12 दिवस सहलींचे 8 पर्याय
काश्मीर 6 ते 9 दिवस सहलींचे 8 पर्याय

केसरीच्या स्पेशॅलिटी टूर्स | KESARI SELECT CUSTOMIZED HOLIDAYS 1800 266 9080, 86577 58850 | KESARI CORPORATE TOURS 70300 11444, 914556 1122 | Foreign EXchange | Shop travel-curated products. www.shop.kesari.in
8657 92 4776 | 1800 266 1100 सोमवार ते शनिवार 10 ते 7 रविवार 11 ते 6
नागपूर 0712-6921717, नागपूर 8657924776, मुंबई 022-61744100, विलेपार्ले 7045 23 4545 | बोरीवली 022 69582200, वसई 7045 00 0031, ठाणे 022-69721100, डोंबिवली 7045 00 0041 | वाशी 022-69462222, पुणे 020-66465555, बाणेर 020-69101234, नाशिक 0253-6914444 | कोल्हापूर 0231-2533222, नागपूर, खामला 9665614795, शंकर नगर 9819767066 | यवतमाळ 9284160756, अमरावती 9890290878, अकोला 9370334515, बुलढाणा 9822462040
KESARI.in